मजकुर :—

दिनांक २८/१२/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **Best Detection of the Month** माहे नोव्हेंबर—२०२१ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ नोव्हेंबर—२०२१

| | | |
|---|---|---|
| ०१ | गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष—५, मुंबई. | गु.र.क्र. ६७७/२०२१ कलम—३०२ भा.द.वि., (पंतनगर पो.ठाणे मुंबई) |

—: '' शारीरीक व लैगिंक अत्याचार करण्याच्या हेतूने निघृण खुन '':—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात दि. ०२/११/२१ रोजी १६:०५ वा. च्या पुर्वी कोणीतरी अज्ञात इसमाने अनोळखी मयत महीलेचे तोंड, गळा व पाय, घट्ट पट्टयाने आवळून तिच्यावर शारीरीक अत्याचार करण्याच्या हेतूने तिला खाली पाडून जखमी करून तिचा खुन केला म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री विजयकुमार सुधाकर करदेकर वय ५७ वर्षे |
| बळीत इसम | :— | शोभा संतोष सोनी वय ५२ वर्षे (रोड साईट) |
| आरोपी अटक व दिनांक | :— | सागर नि हाल यादव वय, ४० वर्षे, (रोड साईट)<br>अटक दिनांक १३/११/२०२१ |

**तपास कौशल्य :—** नमुद गुन्हयात दिनांक ०२/११/२०२१ रोजी १६.०५ वा चे सुमारास पंतनगर पोलीस ठाणे हददीत अंदाजे ५० वर्षे वयोगटाच्या बेवारस महिलेचा नग्न अवस्थेतील मृतदेह मिळून आला. सदर महिलेवर लैंगिक अत्याचार करतेवेळी महिलेने आराडाओरड करू नये म्हणून तिचे तोंड कापडी पटटयाने घटट बांधलेले तसेच दोन्ही पाय वर उचलून खांदयाजवळ नेवून छातीच्या दिशेने वाकवून हात पाय कापडी पटटयाने व तिचे नेसणीस असलेल्या निळया रंगाच्या पायजामाने बांधलेल्या स्थितीत होते. तसेच तिचे डोके दगडाने ठेचून तिचा निघृणरित्या खून केला होता.

गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून गुप्रशा, गुअवि, कक्ष ५ कार्यालयामार्फत तात्काळ पाच तपास पथके तयार करण्यात आली. सर्वप्रथम गुन्हयाच्या घटनास्थळी भेट देवून पाहणी व चौकशी केली असता सदर मृत महिलेस ओळखणारे तसेच गुन्हयासंदर्भात प्रत्यक्षदर्शी साक्षीदार किंवा सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बाबत काहीएक माहिती मिळून आली नाही. त्यामुळे सदर घटना नेमकी कोणत्या वेळी व कधी घडली असावी याबाबत निश्चीत माहिती प्राप्त न झाल्याने घटनास्थळावर येणाऱ्या सर्व मार्गावरील खाजगी दुकाने, सोसायटी येथील सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांची दिनांक ०१ व ०२/११/२०२१ रोजीचे संपूर्ण दिवस व रात्रीचे फुटेज प्राप्त करण्यात आले.

प्राप्त केलेल्या फुटेजची बारकाईने तपासणी केली असता घटनास्थळापासून साधारणत: १०० मिटर अंतरावर असलेल्या एका सोसायटीतील खाजगी सी.सी.टी.व्ही. कॅमेरामधून घटनास्थळाजवळ अस्पष्ट असा एक संशयित इसम दिनांक ०२/११/२०२१ रोजी रात्रौ ०१.०० वा च्या दरम्यान वाचनालयाजवळ झोपलेल्या बळीत महिलेस दोन्ही हाताने उचलून वाचनालयाच्या मागील आडोशाला घेवून जात असताना दिसून आला. त्यानंतर तो वाचनालया मागून परत बाहेर आल्याचे दिसून आले नाही. म्हणून नमूद इसम कोठून आला याबाबत शोध घेण्याकरीता घटनास्थळापासून ते घाटकोपर रेल्वे स्थानक व पुर्व द्रुतगती महामार्ग या दरम्यानचे एकूण ३९ खाजगी कॅमेऱ्यांचे फुटेज प्राप्त करण्यात आले. प्राप्त फुटेजची तपासणी केली असता घटनास्थळावर बळीत महिलेला उचलत असलेला संशयित इसम हा दिनांक ०१/११/२०२१ रोजी २३.४५ वा घाटकोपर रेल्वे स्थानकामधून बाहेर येत असताना व तो उजव्या पायाने लंगडत असल्याचे आढळून आले.

नमूद संशयित इसम हा गुन्हा केल्यानंतर कोणत्या दिशेने पळून गेला याबाबत कळून येत नसल्याने रात्रौ ०१.०० वा नंतर घटनास्थळापासून ते घाटकोपर रेल्वे स्थानक व पुर्व द्रुतगती महामार्ग या दरम्यानचे वेगवेगळया मार्गावरील प्राप्त फुटेजमध्ये एखादा इसम लंगडत चालत आहे किंवा कसा याचा शोध घेतला असता घाटकोपर रेल्वे स्थानकातील सी.सी.टी.व्ही. फुटेज मध्ये एक संशयित इसम लंगडत जात असल्याचे दिसून आले. नमूद इसमाची चालण्याच्या लकबवरून घटनास्थळी येणाऱ्या संशयित इसम हा तोच

असावा असा प्राथमिकदृष्ट्या अंदाज बांधण्यात आला.

त्यानंतर घटनास्थळाजवळ लंगडत चालणाऱ्या इसमाचा शोध घेण्याकरीता एक पथक तयार करण्यात आले व घाटकोपर रेल्वे स्थानकातील सी.सी.टी.व्ही. फुटेज मध्ये दिसून आलेल्या लंगडत चालणाऱ्या इसमाचा शोध घेण्याकरीता दुसरे पथक तयार करण्यात आले. लंगडत चालत असलेल्या इसमाचा शोध घेणाऱ्या पथकास नमूद संशयित इसम हा घाटकोपर रेल्वे स्थानकावर सी.एस.टी. ते टिटवाळा येथे जाणाऱ्या लोकल ट्रेन ने रात्रौ २३.३० वा च्या सुमारास आला असल्याचे दिसून आले. त्यामुळे सी. एस.टी. ते घाटकोपर स्थानकादरम्यान येणाऱ्या सर्व रेल्वे स्थानकावरील सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासले असता नमूद संशयित इसम हा कुर्ला रेल्वे स्थानकावरून नमूद लोकल ट्रेन मध्ये बसला असल्याचे दिसून आले. त्यानंतर संशयित इसम कुर्ला रेल्वे स्थानक येथे कोठून आला याचा शोध घेण्याकरीता रेल्वे स्थानकाकडे येणाऱ्या एकूण ७३ खाजगी सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांचे फुटेज तपासणी केली असता सदरचा संशयित इसम मानखुर्द येथून चेंबूर नाका मार्गाने पायी लंगडत चालत चालत कुर्ला रेल्वे स्थानक येथे आला असल्याचे दिसून आले. तसेच सदर फूटेजच्या बारकाईने केलेल्या तपासणीत नमूद संशयित इसम हा चेंबूर नाका परिसरात दोन व्यक्तींशी साधारण १० मिनीटे बोलत उभा असल्याचे आढळून आले.

त्याअनुषंगाने नमूद दोन्ही व्यक्ती संशयित आरोपीतास ओळखत असावेत व त्यांच्याकडून संशयित आरोपीताची माहिती मिळणे शक्य असल्याने नमूद दोन्ही व्यक्ती चेंबूर नाका परिसरातून कोठे गेले याचा एकूण ३४ सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांच्या मार्फतीने शोध घेतला असता दोन्ही व्यक्ती हे सायन येथील गुरूकृपा हॉटेल येथे गेल्याचे आढळून आले. त्यानंतर गुरूकृपा हॉटेल येथे जावून नमूद दोन्ही व्यक्तींबाबत चौकशी केली असता ते सदर हॉटेलमध्ये भांडी धुण्याचे काम करत असल्याची माहिती मिळून आली. नमूद दोन्ही व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून संशयित इसमाबाबत विचारपुस केली असता त्यातील एका व्यक्तीने माहिती दिली की, गुरूकृपा हॉटेल येथे रोज सकाळी ८.०० वा च्या सुमारास गरीब लोकांना मोफत समोसे वाटप केले जातात. दिनांक ०१/११/२०२१ रोजी सकाळी ०७.३० वा च्या सुमारास गुन्हयातील संशयित इसम हा सदरठिकाणी मोफत समोसा घेण्याकरीता उभा असताना गुरूकृपा हॉटेल येथील मुकादम श्री. श्रीनीवास पिल्लई यांनी त्यास भांडी धुण्याचे काम करणार का म्हणून विचारणा केली असता त्याने त्यास होकार देवून तो त्यांचेसह चेंबुर जिमखाना येथे भांडी धुण्यासाठी गेला होता.

सायकांळी ०७.०० वाजता पर्यत त्यांनी चेंबुर जिमखाना येथे एकत्र काम केले. त्यानंतर तो तेथून मांटुगा येथे जात असल्याचे सांगून निघुन गेला. नमूद दोन्ही व्यक्तींकडे संशयित इसमाच्या संपुर्ण दिवसातील हालचालींबाबत सखोल चौकशी केली असता त्यांनी माहिती दिली की, नमूद संशयित इसमास गांजा पिण्याचे व्यसन असून तो मागील काही दिवसांपुर्वीच जेलमधून बाहेर आला असल्याचे संशयित इसमाने त्यांना सांगितले आहे.

दुसऱ्या पोलीस पथकास सदरचा संशयित इसम हा दिनांक ०२/११/२०२१ रोजी सकाळी ०५. ३० वा च्या सुमारास सी.एस.टी. येथे जाणाऱ्या लोकल ट्रेन मध्ये बसल्याचे दिसून आले. त्यामुळे घाटकोपर ते सी.एस.टी. स्थानकादरम्यान जाणाऱ्या सर्व रेल्वे स्थानकावरील सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासले असता नमूद संशयित इसम हा माटुंगा रेल्वे स्थानकावर ट्रेनमधून उतरून रेल्वे स्थानकाबाहेर माटुंगा पुर्व च्या दिशेने गेल्याचे दिसून आले. परंतू त्याठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरा उपलब्ध नसल्याने जवळच असलेल्या माटुंगा रोड रेल्वे स्थानकावरील सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्याची तपासणी केली असता संशयित इसम हा साधारणत: सकाळी ०६.३० वा च्या सुमारास एका इसमासह माटुंगा रोड ते अंधेरी येथे जाणाऱ्या लोकल ट्रेन मध्ये बसत असल्याचे दिसून आले. त्यानंतर माटुंगा रोड ते अंधेरी लोकल ट्रेनच्या मार्गावरील सर्व रेल्वे स्थानका वरील सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासले असता संशयित इसम व त्याचेसह असलेला इसम हे दोघे बांद्रा रेल्वे स्थानकावर ट्रेन मधून उतरून ते दोघे रेल्वे स्थानकाबाहेर बांद्रा पश्चिम येथे पायी चालत चालत बांद्रा बस डेपो जवळ जाताना दिसून आले.

नमुद दोघेजण माहूलगाव येथे जाणाऱ्या बस क्रमांक ४७३ बसले त्याअनुषंगाने एकुण ३३ बस थांब्यावरील उपलब्ध असलेले किंवा बस थांब्याजवळील परिसरात उपलब्ध असलेले सर्व सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांचे सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासले परंतू संशयित इसम व त्याचेसह असलेला इसम कोठेही आढळून

आला नाही. त्यानंतर सदर पथकाने बेस्ट बस क्रमांक ४७३ मध्ये संशयित आरोपी सोबत बसलेल्या इसमाचा शोध घेतला असता तो दिनांक ०७/११/२०२१ रोजी माटुंगा परिसरात मिळून आला. त्याचेकडे संशयित इसमाबाबत चौकशी केली असता त्याने दिनांक ०२/११/२०२१ रोजी तो व संशयित इसम बी. के.सी. मधील एम.एम.आर.सी.ए. या कार्यालयात रोजंदारीवर भांडी धुण्याच्या कामासाठी गेले होते. सदरठिकाणी त्यांनी सायंकाळी ०५.३० वा पर्यंत एकत्र काम केले व त्यानंतर ते तेथून माटुंगा येथे निघुन गेले. मांटुगा येथून सदर संशयित इसम कोठे गेला तसेच सदर इसमाबाबत त्याला काहीएक माहिती नसल्याचे सांगितले.

नमूद इसमाकडे संशयित इसमाच्या संपुर्ण दिवसातील हालचालींबाबत सखोल चौकशी केली असता, त्याने नमूद संशयित इसमास गांजा पिण्याचे व्यसन असून तो कामावर असताना देखील वारंवार गांजा पित होता. तसेच ज्या ज्या ठिकाणी मोफत जेवन दिले जाते अशा परिसराच्या जवळील रेल्वे स्थानक व फुटपाथवर राहत असतो तसेच जी.टी.बी. नगर रेल्वे स्थानका जवळ जास्तीत जास्त गुरूव्दारे असल्याने त्यास सकाळ व संध्याकाळचे जेवण मोफत भेटत असल्याने तो त्या परिसरात जास्त वेळ घालवत असून तो मागील काही दिवसांपुर्वीच जेलमधून बाहेर आला असल्याबाबत संशयित इसमाने त्यास सांगितले असल्याची माहिती दिली.

तपासात एकदंरीत पथक क्रमांक १ व पथक क्रमांक २ यांना संशयित इसमांबाबत मिळालेली माहिती हि एकच असल्याने सदर संशयित इसमाने गुन्हा केल्यानंतर आपली ओळख लपविण्यासाठी घटनास्थळावरच त्याच्या अंगावरील कपडे बदलल्याचे समजून आले. नमूद संशयित इसम हा काही दिवसांपुर्वी जेलमधून बाहेर आला असल्याबाबत माहिती मिळून आल्याने पथक क्रमांक ३ यास मुंबई, ठाणे व नवी मुंबई येथील सर्व कारागृहात प्रत्यक्ष भेटी देवून संशयित इसमाच्या फोटो च्या आधारे व मागील महिन्याभरात जेल रिलीज झालेल्या आरोपीतांची माहिती प्राप्त करणेकरीता रवाना करण्यात आले.

पथक क्रमांक ३ यांनी नमूद संशयित इसमाचा फोटोच्या आधारे तळोजा मध्यवर्ती कारागृह येथील कर्मचारी व अधिकारी यांचेकडे चौकशी केली असता नमूद संशयित इसमाचे नाव सागर निहाल यादव, वय ३० वर्षे, रा.ठि. वाशी बस डेपो समोरील फुटपाथ, वाशी, नवी मुंबई असे मिळून आले. तसेच वाशी पोलीस ठाणे गु.र.क्र. ४२९/२०१६ कलम ३०२, ५०४, ५०६ भा.द.वि. या गुन्हयात एका महिलेच्या डोक्यात दगड घालून निघृणरित्या खून केल्याच्या गुन्हयात तळोजा कारागृहात शिक्षा भोगत होता. तो दिनांक ०७/१०/२०२१ रोजी तळोजा कारागृहातून मुक्त झाला असल्याची माहिती मिळून आली. त्यानंतर वाशी पोलीस ठाणे येथे जावून गु.र.क्र. ४२९/२०१६ या गुन्हयाचे दोषारोप पत्र प्राप्त करण्यात आले. त्याआधारे त्यावेळेच्या गुन्हयातील साक्षीदार यांचा शोध घेवून त्यांच्याकडे आरोपी सागर यादव याच्या वास्तव्याबाबत विचारणा केली असता सागर हा फुटपाथवर रहावयास असून मिळेल त्याठिकाणी वाडी कामगाराचे (कॅटरर्स कडे भांडी धुण्याचे) काम करतो व मोफत जेवण मिळेल अशा गुरूव्दारा, मस्जिद व मंदिर परिसरात रात्रौ झोपत असल्याची माहिती मिळून आली.

नवी मुंबई परिसरातील झुलेलाल मंदिराच्या मागील फुटपाथवर झोपत असलेल्या इसमांकडे चौकशी केली असता सागर यादव याचे लहनपणी चे दोन मित्र मिळून आले. त्यांच्याकडे सागर यादव बाबत अधिक विचारपूस केली असता, त्यांनी सागर हा नवी मुंबई परिसरात कचरा वेचण्याचे काम करून वेचलेला कचरा मानखुर्द परिसरातील वेगवेगळया कचरा खरेदी करणाऱ्यांकडे विक्री करत असतो. कचरा विक्री करून मिळालेल्या पैशांनी सागर गांजा व देशी दारू पित असतो. सागर नवी मुंबई येथील ए.पी.एम.सी. मार्केट, झुलेलाल मंदिर व वाशी स्थानक परिसरातील फुटपाथवर तसेच मुंबई येथील मानखुर्द, अॅन्टॉप हिल व डॉकयार्ड परिसरातील फुटपाथवर रात्रीच्या वेळी झोपत असून नवी मुंबई व मुंबई मधील मोफत जेवण मिळणाऱ्या गुरूव्दारा, मस्जिद, मंदिर याठिकाणी जेवण करतो. तसेच यादव हा अतिशय हुशार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत ही बाब सागर यास माहिती झाल्यास तो तात्काळ मुंबई बाहेर पळून जाण्याची शक्यता असलेबाबत त्याच्या मित्रांनी सांगितले.

पथक क्रमांक ४ यास मध्य मुंबईतील मोफत जेवण मिळणाऱ्या सर्व गुरूव्दारा, मस्जिद, मंदिर तसेच सायन परिसरातील गुरूकृपा हॉटेल, माटुंगा रेल्वे स्थानक बाहेर, माहिम दर्गा परिसर, अॅन्टॉप हिल परिसरातील

४ गुरूव्दारे व डॉकयार्ड परिसरातील रेल्वे स्थानक याठिकाणी आरोपी सागर यादव याचा शोध घेण्याकरीता नेमणूक करण्यात आली. तसेच पथक क्रमांक ५ यांस पुर्व मुंबईतील मोफत जेवण मिळणाऱ्या सर्व गुरूव्दारा, मस्जिद, मंदिर तसेच मानखुर्द परिसरातील कचरा खरेदी करणारे, मानखुर्द रेल्वे स्थानक व नवी मूंबई परिसरातील ए.पी.एम.सी. मार्केट, झुलेलाल मंदिर, वाशी स्थानक परिसरात रात्रीच्या वेळी कचरा वेचणारे इसम यांचेवर लक्ष ठेवणेसाठी नेमणूक करण्यात आली.

**वर नमूद पोलीस पथकातील अधिकारी कर्मचारी हे फाटकी मळकट कपडे परिधान करून कचरा वेचणाऱ्या इसमाचा दिनांक ०९/११/२०२१ रोजी पासून ते दिनांक १३/११/२०२१ रोजी पर्यत दिवसरात्र पाहिजे संशयित आरोपी सागर यादव याचा शोध घेत असताना आरोपी सागर यादव हा दि. १३/११/२०२१ रोजी सायकांळी १८.०० वा च्या सुमारास मानखुर्द रेल्वे स्टेशन येथून संशयास्पदरित्या जात असताना दिसून आला.** म्हणून पोलीस पथकाने त्यास तात्काळ शिताफिने ताब्यात घेवून त्याचेकडे केलेल्या चौकशीत त्याने दि.०२/११/२०२१ रोजी मध्यरात्री बिल्डींग क्रमांक ३८ व ३९ मधील मोकळी जागा, पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई येथील महीलेस लैंगीक अत्याचार करण्याचा प्रयत्न करत असताना तिने प्रतिकार केला म्हणून तिला नग्न करून तिचे हात पाय व तोंड बांधून तिच्या डोक्यात दगड टाकून तिचा खुन केला असल्याची कबुली दिली. म्हणून त्यास पुढिल कारवाई करीता पंतनगर पोलीस ठाणेच्या ताब्यात देण्यात आले आहे.

नमुद गुन्हयात बळीत महिला हि रोड साईड गरीब बेवारस महिला असल्याने तिचा कोणी वैरी आहे किंवा कसे याची काहीही माहिती नसताना, तसेच सदर गुन्हयाचे घटनास्थळी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार किंवा सी. सी.टी.व्ही. फुटेज याबाबत काहीएक सुगावा नसताना सदर गुन्हयाची उकल करणे अतिशय क्लिस्ट होते. तसेच साकीनाका परिसरात अशाच प्रकारचा महिलेवर लैंगीक अत्याचार करून खून केल्याचा गंभीर गुन्हा घडला होता. त्यामुळे सोशल मिडीया व प्रसार माध्यमांव्दारे पोलीस दलाची बदनामी करण्यात आली होती.

हि बाब लक्षात घेता कक्ष ०५ कार्यालयातील पोलीस पथकाने १२ दिवस अहोरात्र प्रयत्न केले. सदरचा गंभीर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पोलीस पथकाने गुन्हयाचे घटनास्थळावरील रात्रीच्या वेळेचे अस्पष्ट असलेले फुटेज प्राप्त करून त्या फुटेजवरून आरोपीची चालण्याची लकब, वेशभुषा, पायातील चप्पलेचा रंग व केसांची रचना यांचा बारकाईने अभ्यास केला. तसेच आरोपी गुन्हा करणेकरीता घटनास्थळी येण्याच्या मार्गावरील व गुन्हा करून घटनास्थळावरून जाण्याच्या मार्गावरील सर्व लहान मोठी मार्ग, खाजगी सोसायटी, सरकारी कार्यालये, खाजगी दुकाने — आस्थापना, रेल्वे स्थानके, बस स्थानके अशा ठिकाणावरील सर्व सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांचे फुटेज प्राप्त करून त्यांची बारकाईने पाहणी करून पाहीजे आरोपीचे स्पष्ट चित्रण प्राप्त करण्यात आले. त्याआधारे आरोपीताचा पुर्वाभिलेख प्राप्त करून पुर्वीच्या गुन्हयातील साक्षीदार व आरोपीताचे लहानपणीचे मित्रांचा शोध घेवून आरोपीताचे राहणीमान, दैनंदिन नित्यक्रम समजून घेवून वेगवेगळी ०५ पोलीस पथके तयार करून गुन्हयाची उकल केलेली आहे

**गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष—५, मुंबई तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | प्रभारी पोलीस निरीक्षक | श्री. घनश्याम सत्यदास नायर | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | श्री. सदानंद किशनराव येरेकर | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | म.सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्रीम. अर्चना अभिमान पाटील, | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री.सुशांत सोपान बंडगर | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री. संजय वसंत जगताप | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री. अमोल माधव माळी | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री. जयदिप मोहन जाधव | |
| ०८ | पोलीस उप निरीक्षक | श्री. लक्ष्मण अमोगसिध्द वडरे | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | स.पो.उ.नि.क्र.२२५१२ | संजय रामदीप यादव | प्रशस्तीपत्रक |
| १० | स.पो.उ.नि.क्र.२७९८३ | सुधाकर नामदेव साळूंखे | प्रशस्तीपत्रक |
| ११ | स.पो.उ.नि.क्र.२८२२७ | अंकुश बाबालाल न्यायनिर्गुणे, | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.ह.क्र.११०३४ | अशोक पांडुरंग भुजबळ, | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ह.क्र.२९७९९ | रविंद्र महिपत राणे | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | पो.ह.क्र.२९८५४ | अर्जुन शिवराम गुरव | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.ह.क्र.३१२३४ | धनंजय आनंद पैंगणकर | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.ह.क्र.३१२४९ | विलास देविदास देसाई, | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.ह.क्र.९६०५३६ | नितेश नारायण विचारे | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.ना.क्र.३३४०९ | इक्बाल संतोष सिंग | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.ना.क्र.०१—५८ | अविनाश शंकर चिलप | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.ना.क्र.०३—२०४ | तानाजी शंकर पाटील | प्रशस्तीपत्रक |
| २१ | म.पो.ना.क्र.०६—०९६८ | दर्शना शशिकांत साळवी | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पो.शि.क्र.०८—०३६२ | गणेश रघुनाथ काळे | प्रशस्तीपत्रक |
| २३ | पो.शि.क्र.०८—०६८६ | सरफरोज सलिम मुलाणी | प्रशस्तीपत्रक |
| २४ | पो.शि.क्र.०९—०२८४ | युवराज श्रीपती सावंत | प्रशस्तीपत्रक |
| २५ | पो.शि.क्र.१५१—११३ | प्रमोद धोंडीराम पाटील | प्रशस्तीपत्रक |
| २६ | पो.ह.चा.क्र.३३८३७ | अरविंद पिराजी मालुसरे | प्रशस्तीपत्रक |
| २७ | पो.ना.चा.क्र.९९०६०७ | हरेश लक्ष्मण कांबळे | प्रशस्तीपत्रक |

| | | |
|---|---|---|
| ०२ | विनोबा भावे नगर पोलीस ठाणे, मुंबई. परिमंडळ—०५ | गु.र.क्र. ३७६/२०२१ कलम ३०२, ३७६, ३४ भा.द.वि |

**—: ‘‘ लैगिंक अत्याचार करून तिक्षण हत्याराने खुन ’’:—**

<u>गुन्हयाची थोडक्यात हकिकत</u> :— नमुद गुन्हयात दिनांक २५/११/२०२१ रोजी एच.डी.आय.एल. सोसायटी, कुर्ला (प), मुंबई येथे एक बेवारस महिला मृतावस्थेत मिळून आली. सदर अनोळखी महिलेस अज्ञात आरोपी इसमांनी अज्ञात कारणावरून एच.डी.आय.एल. बिल्डींग, सी विंग चे १३ मजल्यावरील टेरेसवरचे लिफ्ट रूममध्ये लैगिक अत्याचार करून, तिक्ष्ण हत्याऱ्याने गळा चिरून शरिरावर अनेक ठिकाणी भोसकून निघ्रुण हत्या केली म्हणुन गुन्हा नोंद केला.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :— | श्री. किशोरकुमार लहुदास चव्हाण वय ३४ वर्षे, धंदा नोकरी (परि.पोउनि.), |
| **बळीत** | :— | नाजमीन हारूण कुरेशी वय १९ वर्षे |
| **आरोपी अटक व दिनांक** | :— | १) रयान गुफरान खान, वय १९ वर्षे,<br>२) फैसल इम्रान शेख, वय १९ वर्षे,<br>आरोपी क्र. १ यास दिनांक २७/१०/२०२१ रोजी<br>आरोपी क्र. २ यास दिनांक २९/११/२०२१ रोजी |

<u>तपास कौशल्य :—</u> सदर गुन्हयातील बळीत महिलेची अज्ञात इसमांनी अत्यंत क्रुरपणे हत्या करून कोणताही पुरावा न सोडता पळून गेले होते. गुन्हयाचे घटनास्थळी मा. वरिष्ठ अधिकारी यांनी भेट देवून सदर गुन्हयातील अज्ञात आरोपींचा शोध घेवून सदरचा गुन्हा लवकरात लवकर उघडकीस आणण्याचे आदेश दिले.

सदर गुन्हा उघडकीस आणणेकरीता वि.भा.नगर, कुर्ला, धारावी पोलीस ठाणेची विविध पथके स्थापन करून त्यांना विविध जबाबदारी देण्यात आली. त्यानंतर सदर अनोळखी मयत महिलेची मुंबईतील अनेक पोलीस ठाणे कडून मिसींगबाबत माहिती घेतली असता देवनार पोलीस ठाणे ए.एम. आर.नं.१०८/२०२१ दि. २४/११/२०२१ मधील मिसींग महिला ही गुन्हयातील मृत महिलेशी मिळती जुळती वाटत असल्याने तिचे पालकांकडे विचारपुस केली असता त्यांनी सदर मुलगी आपलीच असल्याचे खात्रीपुर्वक सांगितले. तद्नंतर मृत महिलेच्या मोबाईल क्रमांकाचे सी.डी.आर. /एस.डी.आर. प्राप्त करून त्याचे तांत्रिक विश्लेषण करून बळीत महिलेचा मोबाईल क्रमांक व डम डाटा याच्या एकत्रित तांत्रिक विश्लेषणातुन बळीत मुलीच्या सानिध्यातील दोन इसमांना शिताफिने सापळा रचुन १) रयान खान, वय १९ वर्षे व २) फैसल इम्रान शेख, वय १९ वर्षे, यांना ताब्यात घेवून चौकशी केली असता त्यांनी सदर महिलेस सुरा व हातोडीचे सहाय्याने जिवे ठार मारल्याचे कबूल केल्याने त्यांना सदर गुन्हयामध्ये अटक केली.

गुन्हयातील बळीत महिला नाजमीन हारून शेख, वय १८ वर्षे ही गोवंडी टाटानगर येथे

राहणारी असून तिचे बाजुलाच राहणारा रयान खान, वय १९ वर्षे यांस ती लग्न करणेकरीता दबाव आणित होती. परंतु हे आरोपीतास मान्य नव्हते. म्हणुन त्याने आपला मित्र फैसल शेख, वय १९ वर्षे यांचेशी कट करून तसेच माज अक्रम शेख, १९ वर्षे यास गुन्हयाची संकल्पना देवुन सदर महिलेस दिनांक २३/११/२०२१ रोजी घटनास्थळी घेवुन गेले व तिच्यावर लैंगित अत्याचार करून तिक्ष्ण हत्याराने जिवेठार मारले.

गुन्हयाच्या तपासात घटनास्थळ परिसरातील ३३ इमारती (वापरात नसलेल्या) ठिकाणी कोणताही सी.सी.टि.व्ही. अथवा कोणताही पुरावा नव्हता. सदर किचकट स्वरूपाचा गुन्हा बळीत मुलीची मिसींग शोधून तसेच डम डाटा व बळीत मुलीच्या मोबाईल क्रमांकाच्या एकत्रित तांत्रिक विश्लेषणाद्वारे सदरचा गुन्हा २४ तासात उघडकीस आणुन मुंबई पोलीस दलाच्या लौकीकास साजेसे असे उत्कृष्ट काम केलेले आहे.

**विनोबा भावे नगर पोलीस ठाणे, मुंबई तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. राजेश पवार | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | श्री. अजय क्षीरसागर | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | श्री. पंकज धाडगे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | म.पोलीस निरीक्षक | श्रीम. माधुरी पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | सहा. पोलीस निरीक्षक | श्री. मधुकर धुतराज | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पोलीस उप निरीक्षक | श्री. पद्माकर पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पोलीस उप निरीक्षक | श्री. जितेंद्र सपकाळे | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | परि. पोलीस उप निरीक्षक | किशोरकुमार चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पोलीस उप निरीक्षक | प्रविण राठोड | प्रशस्तीपत्रक |
| १० | सहा.पोलीस उप निरीक्षक | इब्राहीम सय्यद | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.ह.क्र.३१६८१ | धनाजी काशिद | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.ना.क्र.०५—०९०१ | आनंद पवार | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ना.क्र.९८०१३५ | विनोद पवार | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.ना.क्र.०३—१४६ | बिपीनचंद्र माळी | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.ना.क्र.०६—१६६ | संतोष शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.शि.क्र.०७—०६३३ | संदीप पाटील | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.शि.क्र.११—३२५१ | गोविंद देवळे | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.शि.क्र.०९—०००७ | रामदास निळे | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.शि.क्र १३—००२६ | अजिनाथ नरबट | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.शि.क्र.११—१६७७ | गणेश काळे | प्रशस्तीपत्रक |

| ०३ | दहिसर पोलीस ठाणे, मुंबई परिमंडळ—१२ | गु.र.क्र. ११६१/२०२१, कलम—३०२,३९४,३९७, ४५२, २०१,३४ भादवि सह ३७(१) १३५ मपोका. |
|---|---|---|

—: " जबरी चोरीसह खुन ":—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात दिनांक ३१/१०/२०२१ रोजी बी—३०२, ओमकार को.ऑप.हौ.सो, चौगले नगर, सावरपाडा, दहिसर, पुर्व, मुंबई या फ्लॅटमध्ये कोणीतरी अज्ञात इसमाने जबरी चोरीच्या उद्‌देशाने धारधार हत्यारे बळीत मनिष बाबुभाई पटेल, वय ४१ वर्ष, याचा खुन करून त्याच्या अंगावरी ब्रेसलेट व सोन्याची चैन व रक्कम रूपये २५०००/— ची जबरी चोरी केली म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | पोउनि अर्जुन जयमल रावराणे, वय ५८ वर्ष |
| बळीत व्यक्ती | :— | मनिष बाबुभाई पटेल, वय ४१ वर्ष, |
| चोरीस गेलेला माल | :— | १) आयफोन<br>२) रोख रक्कम १२५००/—<br>३) एक सोन्याचे ब्रेसलेट किमत अंदाजे ८०,०००/— हजार<br>४) एक सोन्याची चैन किंमत अंदाजे ९०,०००/— हजार<br>५) एक सॅमसग चा स्मार्ट मोबाईल फोन |
| हस्तगत माल | :— | १) निळया रंगाचा आयफोन<br>२) रोख रक्कम १२५००/—<br>३) एक काळया रंगाचे चमडयाचे पाकीट JOOP! त्यावर असे लिहीलेले<br>४)एक निळया रंगाचा सॅमसंग मोबाईल त्याच्यापाठीमागे IS13252C part-1/ICE 60950-1 ISI 16333(part-3) असे लिहीलेले<br>५) एक पिवळया रंगाच्या धातुची कडयाची डिझाईन असलेली चैन त्यामध्ये ओम आकाराचे पिवळया धातुचे पेन्डट वजन अंदाजे २४ ग्रॅम जु.वा.कि.सु. ९०,०००/— रूपये<br>६)एका कडयाचे डिझाईन असलेले पिवळया रंगाचे धातुचे ब्रेसलेट वनज अंदाजे २० ग्रॅम जु.वा. कि.सु.८०,०००/— |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) राहुल रामनाथ शर्मा उर्फ छोटु वय १९ वर्ष<br>२) मकसुद मुमताज शेख उर्फ राजु वय २७ वर्ष<br>१) दि. ०२/११/२०२१ रोजी<br>२) दि. ०३/११/२०२१ रोजी |

**तपास कौशल्य :—** :- नमुद गुन्हयात दिनांक ३१/१०/२०२१ दहिसर—१ मोबाईलवर प्राप्त झालेल्या संदेशावरून दिवसपाळी ठाणे अंमलदार पोउनि रावराणे यांनी घटनास्थळास हजर होवुन नमुद घटनास्थाळाचा घटनास्थळपंचनामा व मृतदेहाचा मरणोत्तर पंचनामा केला. .त्यांनतर सदर ठिकाणी मोबाईल सीडीआर/एसडीआर याची माहीती घेण्यात आली, सदर ठिकाणचा डंम डाटा घेवुन तसेच सोसायटीमधील सीसीटिव्ही फुटेत प्राप्त करण्यात येवुन त्याचे विश्लेषण केले. त्यात त्यात दोन इसम वावरताना दिसून आले.

मयत मनिष बाबुभाई पटेल, वय ४१ वर्ष, यांच्या घरमालकाकडुन त्याचेबाबत प्राप्त माहीतीवरून तो मुळ गुजरात राज्यातला असून त्याचे मुंबईत कोणीही नसल्याचे समजले. व तो नमुद फ्लॅटमध्ये भाडयाने एकटाच राहत असल्याचे कळले. तपासामध्ये सीडीआर/एसडीआरमध्ये मोस्टकॉलर यांच्या गुन्हयाच्या तपासाच्या अनुंषगाने केलेल्या चौकशीमध्ये एक नंबरवर मसताचे नेहमी बोलणे होत असल्याचे दिसून आले.

तसेच मयत इसमाच्या घरात मिळुन आलेल्या किंगफिशर बियरचा टिन व एक नारंगी रंगाची 41 X 32-5 सेमीची नायलॉनची पिशवी व बांबा वाईन शॉपचे फुटेज यामध्ये पडताळणी केली असता घटनास्थळावरील सीसीटिव्ही पडताळणी दिसुन असता घटनास्थळावरील सीसीटिव्ही फुटेज व बांबा वाईन शॉपचे फुटेज यामध्ये दिसणारा इसम सारखेच असल्याचे दिसले. संशयीत इसमाच्या हातातील पिशवी व घटनास्थळावर मिळून आलेली नारंगी रंगाची त्यास काळया रंगाचे बंद असलेली ४१X३२.५ सेमीची नायलॉनची पिशवी एकच असल्याचे निष्पन्न झाले. एका खाजगी इसमाने

सीडीआर/एसडीआरची दिलेली तांत्रिक माहीतीवरून नमुद गुन्हयातील संशयीत आरोपीतांस दलीपुरा ठाणा दिनार, तहसील— गंजभडसरा, जि. रोहतास, राज्य बिहार येथुन तर दुसरा आरोपी वारंवार मोबाईलमधील सिम बदलुन गुंगारा देत असल्याने त्याचा तांत्रिक तपास करून त्यास हॉटेल साई रेसीडन्सी, काशीमिरा या ठिकाणावरून अटक करण्यात आली

अशा प्रकारे दहिसर पोलीस ठाणेचे पथकाने कोणताही पुरावा नसताना मानवी कौशल्य व तांत्रिक तपासाचे आधारे यातील मयत इसम मनिष बाबुभाई पटेल हा मुळचा गुजरातचा असुन त्याचे मुंबईत कोणीही नातेवाईक नसताना तसेच जवळचे कोणी ओळखीचे नसताना सदर इसमाचा जबरी चोरीच्या उद्देशाने धारधार हत्यारे खुन करून त्याच्या अंगावरी ब्रेसलेट व सोन्याची चैन व रक्कम रूपये २५०००/—जबरी चौरी करणाऱ्या आरोपीतास अटक करून सदर खुनाचा गंभीर गुन्हा उघडकीस आणला आहे.

## दहिसर पोलीस ठाणे, मुंबई तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | प्रविण गजानन पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | विकास सर्जेराव लोकरे | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | सहा.पोलीस निरीक्षक | प्रविण नारायण निंबाळकर | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | सहा.पोलीस निरीक्षक | लक्ष्मण बाबु कारंडे | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | सहा. पोलीस निरीक्षक | ओम सुरेशराव तोटावार | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | सहा. पोलीस निरीक्षक | रणजित बाळासाहेब चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पोलीस उप निरीक्षक | गोरखनाथ बबन राव | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पोलीस उप निरीक्षक | अर्जुन जयमल रावराणे | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.ह.क्र.९६०३२५ | मनोज जनार्दन भिंगारे | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.ना.क्र. ९८०३०५ | प्रविण पांडुरंग झेंडे | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.ना.क्र.९९०४१३ | सिध्द्यार्थ जगदिश किणी | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.ना.क्र.०३११६७ | सचिन मनोहर केळजी | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ना.क्र०३१३४२ | निलेश नारायण सांबरेकर | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.शि.क्र०९०८८६ | सुशांत शंकर जाधव | प्रशस्तीपत्रक |

मजकुर :—

दिनांक २८/१२/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या ‘‘ BEST CONVICTION OF THE MONTH " माहे नोव्हेंबर २०२१ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ नोव्हेंबर— २०२१

| | | |
|---|---|---|
| ०१ | दिंडोशी पोलीस ठाणे, मुंबई परिमंडळ—१२ | गु.र.क्र.३४२/२०१५ कलम ३०७, ३०७, ३२६, ३२४, ५०४, ४४७, ५०६(२), १४३, १४४, १४६, १४७, १४८, १४९, ३४ भा.द.वि. सह ३७(१), १३५ म.पो.कायदा |

—: ‘‘ गैरकायद्याची मंडळी जमवुन जीवे ठार मारणे चा प्रयत्न ’’:—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात दिंडोशी पोलीस ठाणे हद्दीतील ओकांर डेव्हलपर्स ऑफीस, गोरेगाव पुर्व, मुंबई येथे यातील फिर्यादी श्री. विजय कमलाकर वायंगणकर, साक्षीदार धनंजय मांडवकर व विष्णु वारे हे त्यांच्या ऑफीसमध्ये असताना यातील आरोपी रोहीत देवेंद्र खोत, शैलेंद्र कौशलेंद्र मिश्रा उर्फ शेरू हे ऑफीसमध्ये घुसले व धनंजय यांच्यासोबत कामावर ठेवण्यावरून वाद घालुन शिवीगाळ केली. आरोपी रोहीत खोत याने त्याच्या कपडयात लपविलेली तलवार काढुन साक्षीदार धनंजय यांच्या डोक्यावर वार करून तसेच डाव्या हाताच्या करंगळीवर गंभीर दुखापत केली. तसेच आरोपी मुबारकअली रफी मोहम्मद सय्यद उर्फ सद्दाम याने त्याच्याकडील चॉपरने पोटावर डावे बाजुस वार केला. फिर्यादी व साक्षीदार त्याला सोडविण्यासाठी गेले असता साक्षीदार विष्णु वारे याच्या डाव्या हाताच्या अंगठयास उजव्या हाताच्या तळव्यास आरोपी रोहीत खोत याने वार करून जखमी केले. तसेच फिर्यादी यांना आरोपी रोहीत खोत याने डोकयाच्या डाव्या बाजुस आणि हातास खांद्यास पाठीवर वार करून जखमी केले. आरोपी रोहीत खोत, शैलेंद्र मिश्रा, मुबारकअली मो. सय्यद उर्फ सद्दाम याने रोडवरील लोकांना हत्यार दाखवुन धमकावले. म्हणुन गुन्हा नोंद..

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. विजय कमलाकर वायंगणकर वय ४५ वर्षे, |
| बळीत | :— | श्री. विजय कमलाकर वायंगणकर वय ४५ वर्षे, व साक्षीदार |
| निकाल दिनांक | :— | दि.२०/११/२०२१ |
| अटक आरोपी व अटक दिनांक | | १) शेलेंद्र कौंशेलेंद्र मिश्रा उर्फ शेरू वय २७ वर्षे<br>२) रोहीत देवेंद्र खोत वय २८ वर्षे<br>अटक दिनांक २४/०६/२०१५ |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | १) कलम ३०७, ३४ भादवि अन्वये जन्मठेप व १०,०००/— दंड,<br>२) कलम ३२६ भादवि अन्वये ७ वर्षाची शिक्षा आणि ५०००/— दंड, दंड न भरल्यास ६ महीन्याची साधी शिक्षा,<br>३) कलम ४४७ भादवि अन्वये ३ महीन्याची साधी शिक्षा व ५०० रू. दंड आणि दंड न भरल्यास १५ दिवस साधी शिक्षा अशी शिक्षा सुनावली |

**तपास कौशल्य** :— तपासी पथकाने यातील फिर्यादी, साक्षीदार, पंच यांना वेळोवेळी मार्गदर्शन करुन मा. न्यायालयात साक्षीकरीता वेळेवर हजर ठेवले. त्याचप्रमाणे गुन्हयातील आरोपीतांविरुध्दचे पुरावे सक्षमपणे मा. न्यायालयासमोर मांडण्यास मदत केली. मा. अति. सत्र न्यायाधिश, कोर्ट रूम नंबर १३, दिंडोशी, मुंबई यांनी साक्षम पुरावेधारे यातील अटक आरोपीतास मा. न्यायालयांनी दोषी ठरवून जन्मठेप सजा सुनावली आहे.

दिंडोशी पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे

| अ. क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री धरणेंद्र श्रीपाल कांबळे, | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | श्री. राजीव शिवाजीराव चव्हाण, | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | श्री. गिरीष अणावकर | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस उप निरीक्षक | श्री.अनिल भालचंद्र मेढेकर | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पो.ह.क्र. ३१३९९, | गोरक्षनाथ ज्ञानदेव लाड, | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.ना.क्र. ९८०२०३ | प्रकाश नामदेव तांबे | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.ना.क्र. ०६.१४०२ | विशाल रामकृष्ण सुरवाडे | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.शि.क्र. ११.३६२३ | निलेश सदानंद भोसले | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | म.पो.शि. ०८१४३८ | शोभा सतिश झोडगे, | प्रशस्तीपत्रक |

| ०२ | साकीनाका पोलीस ठाणे मुंबई परिमंडळ—१० | गु.र.क्र. ४८४/२०११, कलम ३०२ भादवि |
|---|---|---|

—: ‘‘ <u>खुन</u> ’’:—

<u>गुन्हयाची थोडक्यात हकिकत</u> :— नमुद गुन्हयातील फिर्यादी नितिन चंद्रकांत घाडगे, हि/३७ वर्षे यांच्यासोबत त्यांची आई नामे रत्नाबाई घाडगे, पत्नी—निशा घाडगे, छोटा भाऊ सिध्दार्थ असे एकत्रित राहतात. भाऊ सिध्दार्थ हा काहीच कामधंदा करीत नाही. त्याला गांजा पिण्याची सवय असून त्यासाठी तो कुटूंबियाना नेहमी पैसे मागत असे, पैसे नाही दिले तस कुटूंबियासोबत भांडण करीत असे.

दिनांक १४/१२/२०११ रोजी २०.०० वा.च्या सुमारास फिर्यादी हे कामावरून घरी आले असता, त्यांची पत्नी निशा हिने सांगितले की, सिध्दार्थ याने गांजा पिण्यासाठी पैसे मागितले होते व पैसे न दिल्याने त्याने तीला व वयोवृध्द आईस शिवीगाळ केली होती व त्याने त्यांना बघुन घेण्याची धमकी दिली होती.

दिनांक १५/१२/२०११ रोजी सकाळी ०७.०० वा.फिर्यादी हे नेहमीप्रमाणे कामावर गेले असता, दुपारी १४.३० वा.च्या सुमारास त्यांच्या नोकरीच्या ठिकाणी फोन आला की, त्यांची पत्नी निशा हिच्या डोक्यात गंभीर दुखापत झाली असून त्यांना बेशुध्द अवस्थेत राजावाडी रूग्णालयात उपचारकामी दाखल केले आहे. फिर्यादी तात्काळ राजावाडी रूग्णालयात पोहचुन पाहिले असता, पत्नी निशाच्या डोक्याला बॅडेंज गुंडाळलेले असून ते रक्ताने लाल झाले आहे. झाले प्रकाराबाबत फिर्यादी यांनी त्यांच्या आई रत्नाबाई यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांनी सांगितले की, दिनांक १५/१२/२०११ रोजी १४.०० वा.चे सुमारास मुलगा सिध्दार्थ याने आदल्या दिवशी गांजा पिण्यासाठी पैसे दिले नाही म्हणून घरातील कुऱ्हाडीने निशाच्या डोक्यावर मागील बाजुस दोन वेळा घाव करून गंभीर दुखापत केली व तो पळून गेला अशी हकिकत सांगितली. त्याप्रमाणे फिर्यादी यांचा जबाब नोंद करून तीच गुन्हयाची प्रथम खबरी अहवाल समजुन दिनांक १५/१२/२०११ रोजी भादवि कलम ३०७ नुसार सुरवातीला गुन्हा नोंद करण्यात आला. गंभीर जखमी निशा यांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाल्याने गुन्हयाच्या कलमात ३०२ भादवि कलम बदल करून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. नितिन चंद्रकांत घाडगे, वय ३७ वर्षे, |
| बळीत | :— | श्री. नितिन चंद्रकांत घाडगे, वय ३७ वर्षे, |
| निकाल दिनांक | :— | दि.२५.११.२०२१ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | | सिध्दार्थ चंद्रकांत घाडगे, वय २६ वर्षे<br>**अटक दिनांक ११/१२/२०११** |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | कलम ३०२ भादवि अन्वये जन्म ठेपेची शिक्षा आणि रू. १००००/— दंड, दंड न भरल्यास दोन महिने साधी कैद शिक्षा सुनावली आहे. |

<u>तपास कौशल्य</u> :— यातील तपासी पथकाने यातील घटनास्थळावर मिळून आलेले हत्यार (लोखंडी

कुऱ्हाड), आरोपी व फिर्यादी यांचे रक्ताने माखलेले कपडे इ. मुद्देमाल न्याय सहायक प्रयोगशाळेत परिक्षणा करीता पाठवुन त्याचा अहवाल तत्परतेने प्राप्त करून न्यायालयात वेळेवर सादर केला. तसेच पो.नि.गुन्हे व पथकाने वेळोवेळी न्यायालयाचे आदेशाने एकूण १२ साक्षीदार सुनावणी तारखेस हजर ठेवले व गुन्हा सिध्द होण्यास प्रामाणिक प्रयत्न केले.

साकीनाका पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. बळवंत व्यकंट देशमुख | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | श्री. शिवाजी पर्बतराव गवारे | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | श्री. दिनकर भास्कर राऊत | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | सहा. पोलीस निरीक्षक | श्री. संभाजी रा. मोहिते | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पो.ह.क्र ८९९९ | अनिल शांताराम देवकर | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.शि.क्र.०८००६६ | ओंकार रामचंद्र जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | म.पो.शि.क्र.०८०८७४ | वैशाली गोरख मुटेकर | प्रशस्तीपत्रक |